**वाचा :-** १) म.उप सचिव, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन,२५,मर्झबान पथ, मुंबई-४०० ००१ यांचेकडील शासन आदेश क्र.मविसे-१०१७/प्र.क्र.७१(भाग-१)/२०१७/आस्था-३, दि. २१ जुन २०१७.

२) म. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडील आदेश क्र. साप्रवि-१/उआस्था-१/००७९/ /२०१७ दिनांक-१२/०१/२०१७

३) श्री. जितेंद्र राजेंद्र देवरे, गट विकास अधिकारी, यांचा रुजू होणेबाबतचा रिपोर्ट दि.२१/०६/२०१७

४) कार्यालयीन मंजुर टिपणी दिनांक- 22/06/२०१७

---

नाशिक जिल्हा परिषद,नाशिक

जा.क्र.साप्रवि/आस्था-१/ ८८८ /२०१७

नाशिक दिनांक 22/06/२०१७

**आदेश**

सार्वजनिक सेवेच्या हितार्थ वाचा क्र.१ अन्वये श्री. जितेंद्र राजेंद्र देवरे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती बोदवड याचे दि.११/०१/२०१७ रोजीच्या आदेशात अंशंतः बदल करुन श्री.डोंगर महारु बहिरम, गट विकास अधिकारी, पंचायत समिती बागलाण, जि.नाशिक या पदावर पदस्थापना देण्यात आली आहे. वाचा क्र. ०२ अन्वये श्री. देवरे, यांना बदलीने दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्यासाठी दि.१२/०१/२०१७ रोजी मध्योनोत्तर कार्यमुक्त करण्यात आलेले आहे.

तसेच वाचा क्र.१ अन्वये श्री.डोंगर महारु बहिरम,गट विकास अधिकारी, पंचायत समिती बागलाण, जि.नाशिक पदावरुन बदलीने पदस्थापना गट विकास अधिकारी, पंचायत समिती कळवण जि.नाशिक या पदावर बदली करण्यात आलेली आहे.

सबब श्री. देवरे, हे जिल्हा परिषद,नाशिक येथे दि.२१/०६/२०१७ रोजी मध्योनोत्तर गट विकास अधिकारी, पंचायत समिती बागलाण, जि.नाशिक या पदावर हजर झाले आहेत. त्या अनुषंगाने श्री.डोंगर महारु बहिरम,गट विकास अधिकारी, पंचायत समिती बागलाण, जि.नाशिक यांना त्यांचे बदली पदस्थापनेचे पदावर हजर होण्यासाठी दिनांक-२१/०६/२०१७ रोजी मध्यान्होत्तर कार्यमुक्त करण्यात येत आहे.

श्री.डोंगर महारु बहिरम, यांनी त्यांचेकडील गट विकास अधिकारी, पंचायत समिती बागलाण, जि.नाशिक हया पदाचा कार्यभार नव्याने हजर झालेले श्री. जितेंद्र राजेंद्र देवरे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बागलाण यांचेकडेस सुपुर्द करावा. व श्री. जितेंद्र राजेंद्र देवरे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बागलाण यांनी गट विकास अधिकारी,पंचायत समिती बागलाण, जि.नाशिक या पदाचा कार्यभार तात्काळ स्विकारावा. कार्यभार हस्तांतर केल्याबद्लचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करावे. सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यांत यावी.

श्री.डोंगर महारु बहिरम, गट विकास अधिकारी, पंचायत समिती बागलाण, जि.नाशिक यांनी त्यांचे अधिनस्त कार्यरत असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचे दिनांक -३१/०३/२०१७ पावेतोचे गोपनिय अहवाल प्रतिवेदीत / पुर्नविलोकन करुन तसेच दिनांक-०१/०४/२०१७ ते दि.२१/०६/२०१७ कार्यमुक्त दिंनाकापावेतोचे गोपनीय अहवाल व अल्प कालावधी प्रमाणपत्र देखील संबंधीत आस्थापनांकडे तात्काळ सादर करावे.

सदर आदेशाची नोंद श्री.डोंगर महारु बहिरम, यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यांत यावी.

22/06

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

प्रति,

श्री. डोंगर महारु बहिरम, गट विकास अधिकारी, पंचायत समिती बागलाण, जि.नाशिक

श्री. जितेंद्र राजेंद्र देवरे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती बागलाण, जि.नाशिक

प्रत :- माहितीसाठी सविनय सादर

म.अवर सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय मुंबई -३२

म.उप सचिव, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन,२५,मर्झबान पथ,मुंबई-४०० ००१

म.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक

प्रत :- माहितीसाठी सस्नेह अग्रेषित

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव

प्रत :- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) जिल्हा परिषद नाशिक/ जळगांव

कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, नाशिक/जळगांव

मुख्य लेखा वित्त अधिकारी जिल्हा परिषद,नाशिक/ जळगांव